RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक २(२)] शुक्रवार, जानेवारी २०, २०२३/पौष ३०, शके १९४४ [पृष्ठे १४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जानेवारी, २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक : एमयूएन-२०१९/प्र.क्र. २४० /नवि-१८.—ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या ३४१ अ चे पोट-कलम (१), (१ब) आणि २ आणि कलम ३ चे पोट-कलम (३) यांच्या तरतुदीनुसार, शासन उद्घोषणा, नगरविकास विभाग, एमयूएन- २०१९/प्र.क्र.२४०/नवि-१८, दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ याद्वारे **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ यामध्ये उद्घोषणा प्रसिद्ध केली असून, महाराष्ट्र शासनाने नागपूर जिल्ह्यातील बेसा-बेलतरोडी व पिपळा-घोगली या ग्रामपंचायतींचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी व उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी "बेसा-पिपळा नगरपंचायत" या नावाने नगरपंचायत घटीत करण्यासाठी, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ अ चे पोट-कलम (१), (१ब) आणि (२) या अन्वये अधिसूचना काढण्याच्या आपल्या प्रस्तावावर आक्षेप मागविले होते ;

आणि ज्याअर्थी प्राथमिक उद्घोषणा, नगरविकास विभाग, क्र. एमयूएन-२०१९/प्र.क्र.२४०/नवि- १८, दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली ;

आणि ज्याअर्थी, अधिसूचनेत नमूद कालावधीत जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतींचा शासनाकडून विचार करण्यात आला ;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ अ चे पोट-कलम (१), (१ब) आणि (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करीत असून, त्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ अ चे पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, "बेसा-पिपळा नगरपंचायत" या नावाने एक नगरपंचायत घटीत करण्यात येत आहे. उक्त संक्रमणात्मक क्षेत्राच्या हद्दी यासोबत जोडलेल्या अनुसूची "ब" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

## अनुसूची "अ"

संक्रमणात्मक क्षेत्राच्या अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले क्षेत्र

मौजा बेसा सर्व्हे नं. १ ते ९६;

मौजा बेलतरोडी सर्व्हे नं.१ ते १४२;

मौजा पिपळा सर्व्हे नं. १ ते २२१;

मौजा घोगली सर्व्हे नं. १ ते ४१.

## अनुसूची "ब"

संक्रमणात्मक क्षेत्राच्या हद्दीचा तपशील

पूर्व :— बेसा सर्कल सर्व्हे क्र. ८२ ते ९३ यांच्या हद्दीपासून मौजा घोगली सर्व्हे क्र. ६७ ते ९४ हद्दीपर्यंत मौजा पिपळा गावाच्या पूर्व बाजूस हुडकेश्वरची हद्द सर्व्हे १९९, २००, २१४ ते २१८, ५, ६, ९, ११, १२, १३, १५, २०, २१, २६, ३१, ३३, ३४, ३९, ४०.

पश्चिम :— बेसा सर्कल सर्व्हे क्र. ३५ ते ३८ यांच्या हद्दीसह मौजा सोमलवाडा हद्दपर्यंत नागपूर महानगरपालिकेच्या बाजूकडील सर्व्हे नं. २८ ते १४ मौजा चिंचभवनपर्यंत मौजा पिपळा पश्चिम हद्द- बेसा हद्दीमधील सर्व्हे नं. १४१, १४२, १४४, १५६, १५७, १५९, १६०.

दक्षिण :— बेलतरोडी सर्कलमधील सर्व्हे १० ते ७ यासह मौजा शंकरपूर सर्व्हे नं. १३५ ते १४१ पासून मौजा गोतर-पंजारीपर्यंत मौजा पिपळा- दक्षिण हद्द - मौजा कन्हालगाव मधील सर्व्हे नं. ५८, ५७, ५३, ५२, ४४ ब, ४३, ४२, ४१, ४०.

उत्तर :— बेसा सर्कल सर्व्हे क्र. ६३ / १, २, ३ ते ७६ पासून मौजा मानेवाडा हद्दीपर्यंत. नागपूर महानगरपालिकेच्या बाजूकडील सर्व्हे नं. ६२ ते ३९ / २, ३ यासह मौजा बाबुलखेडा, ओमकार नगर हद्दीसह मौजा पिपळा दक्षिण हद्द- पिपळा सर्कल आणि मौजा चिखली मधील सर्व्हे नं. १६६, १६७, १७० ते १७६, १९४, १९५, १९६, १९७, १९८ ची हद्द.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिरुद्ध व्यं. जेवळीकर,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 20th January, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN-2019/C.R.240/UD-18.—Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUN-2019/C.R.240/UD-18, dated the 13th September, 2022 published in the *Maharashtra Government Gazette*, Part-I-A, Extraordinary, Central Division Supplement, dated the 13th September, 2022, issued in pursuance of the provisions of sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A read with sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra had invited objections within a period of thirty days, from the date of publication thereof in the *Maharashtra Government Gazette*, to its proposal to issue a notification under sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A of the said Act, to specify the local area of the village panchayats Besa- Belatrodi and Pipla Ghogli in Nagpur District, being an area in transition from a rural area to an urban area and to be a transitional area and to constitute a *Nagar Panchayat* by the name of "*the Besa Pipla Nagar Panchayat*" for the said transitional area ;

And whereas, the Government Proclamation, Urban Development Department, No MUN-2019/C.R.240/UD-18, dated the 13th September, 2022 was published in the local newspaper ;

And whereas, the objections received in pursuant to the said Proclamation by the Collector of Nagpur District, within the specified period, have been considered by the Government ;

And whereas, having regard to the factors mentioned in clause (*2*) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considers it expedient to specify the said local area, more particularly described in the Schedule "A" appended hereto, to be a transitional area ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, specifies the said local area to be a transitional area, for which there shall be constituted a *Nagar Panchayat* as provided in sub-section (*2*) of said section 341A of the said Act, by the name the *Besa Pipla Nagar Panchayat*. The boundaries of the said transitional area shall be such as are specified in Schedule "B" appended hereto.

*Schedule "A"*

**Description of the transitional area**

Survey Number of village Besa 1 to 96 ;

Survey Number of village Belatrodi 1 to 142 ;

Survey Number of village Pipla 1 to 221 ;

Survey Number of village Ghogli 1 to 41.

*Schedule "B"*

**Boundaries of the transitional area**

*East* :— In Besa Circle Survey No.82 to 93 Runs with Boundary of Mouza Pipla adujesen side Survey No. 67 to 94 Runs along with the boundary Mouza Ghogali Mauza Pipla Eastern Boundary-Hudkeshwar Boundary. 199,200,214,215,216,217,218,5,6, 9,11,12, 13,15,20,21,26,31,33,34,39,40.

*West* :— In Besa Circle Survey No.35 to 38 Runs with Boundary of Mouza Somalwadi adujecent side in Nagpur Municipal Corporation Survey No. 28 to 14 Runs along with the boundary Mouza Chichbhavan Mouza Pipla - Western Boundary-In Besa Boundary 141,142,144,156,157,159,160.

*South* :— In Beltarodi Circle Survey No. 10 to 7 Runs with Boundary of Village Mouza Shankarpur Survey No. 135 to 141 Runs along with the boundary Mouza Gotar-Panjari Mouza Pipla - Southern Boundary - In Kanhalgaw Boundry Survey No. 58, 57,53,52, 44/B, 43,42, 41,40.

North :— In Besa Circle Survey No.63/1,2,3 to 76 Runs with Boundary of Mouza Manewada adujesent side in Nagpur Municipal Corporation Survey No. 62 to 39/2,3 Runs along with the boundary Mouza BabulKheda, Omkar Nagar Mouza Pipla-Northern Boundary-In Pipla Circle and Manuja Chikhali Boundary of Survey No. 166,167,170 To 176,194,195,196,197,198.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIRUDDHA V. JEWLIKAR,
Deputy Secretary to Government.

## नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जानेवारी २०२३.

### आदेश

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयुएन-२०१९/प्र.क्र.२४०/नवि-१८.—ज्याअर्थी, शासन अधिसूचना, नगरविकास विभाग, क्रमांक एमयुएन-२०१९/प्र.क्र.२४०/नवि-१८, दिनांक २० जानेवारी २०२३ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या (१९६५ चा महा. ४०) कलम ३४१अ च्या पोट-कलम (१), (१ब), (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व इतर समर्थ करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने नागपूर जिल्ह्यातील बेसा-पिपळा या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी “बेसा-पिपळा नगरपंचायत” घटीत केली आहे ;

आणि ज्याअर्थी, नव्याने रचना केलेल्या बेसा-पिपळा नगरपंचायतीची रितसर रचना होईपर्यंत उक्त नगरपंचायतीचे अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे इष्ट वाटते ;

म्हणून आता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या (१९६५ चा महा. ४०) कलम ३४० च्या पोट-कलम (२) मधील उप-नियम (इ), खंड (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व इतर समर्थ करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, नव्याने घटीत केलेल्या उक्त नगरपंचायतीची उक्त अधिनियमान्वये यथोचित रचना होईपर्यंत मुख्याधिकारी, नगरपरिषद वानाडोंगरी, जिल्हा नागपूर, श्री. भारत बा. नंदनवार यांची नगरपंचायत बेसा - पिपळाशी संबंधित सर्व अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिरुद्ध व्यं. जेवळीकर,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 20th January 2023.

### Order

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN-2019/C.R.240/UD-18.—Whereas, by the Government Notification, Urban Development Department, No. MUN-2019/C.R.240/UD-18, dated 20th January 2023 issued in exercise of powers conferred by sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra has specified the local area of village Panchayat Besa Pipla in Nagpur District, being an area in transition from rural area to an urban area and to be a transitional area and to constitute a *Nagar panchayat* by the name of "the Besa Pipla *Nagar Panchayat*." for the said transitional area ;

And whereas, it is expedient to appoint the Government Officer to exercise all the powers and duties of the newly constituted Besa Pipla *Nagar Panchayat* till the said *Nagar Panchayat* is duly constituted ;

Now, therefore, in exercise of the power conferred by paragraph (i) of clause (*e*) of sub-section (*2*) of section 340 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby appoints the Chief Officer, Wanadongari Municipal Council, District Nagpur *Shri Bharat B. Nandanwar* as an Administrator of the said newly constituted the Besa Pipla *Nagar Panchayat* to exercise all the powers and duties relating to the Besa Pipla *Nagar Panchayat* till the said *Nagar Panchayat* is duly constituted in accordance with the provision of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIRUDDHA V. JEWLIKAR,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २० जानेवारी २०२३

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी २०२२/ प्र.क्र.६६/(१)/पं.रां.५.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम- पाच) यांचे कलम ४ चे पोट-कलम (१) यासह २५४ चे पोट-कलम (१) चा खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांक समाविष्ट असलेली स्थानिक क्षेत्रे स्तंभ (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून नागपूर जिल्ह्यातून वगळीत आहे.

### अनुसूची

| अ. क्र. (१) | जिल्हा (२) | गट (३) | निवडणूक विभाग (४) | स्थानिक क्षेत्र (५) | वगळण्याचा दिनांक (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | नागपूर (ग्रामीण) | ४०- बेसा | मौजा बेसा सर्व्हे नं. १ ते ९६ | २० जानेवारी २०२३. |
| | | | ४०- बेसा | मौजा बेलतरोडी सर्व्हे नं. १ ते १४२ | |
| | | | ३९- खरबी | मौजा पिपळा सर्व्हे नं. १ ते २२१ | |
| | | | ३९- खरबी | मौजा घोगली सर्व्हे नं. १ ते ४१ | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीकांत लोंढे,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 20th January 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No.ZPB-2022/CR-66/(1)/PR-5.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of sub-section (*1*) of section 254 read with sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Nagpur District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the date mentioned in column (6) thereof.

*Schedule*

| Sr. No. | District | Block | Electoral Division | Local areas | Date of exclusion |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Nagpur | Nagpur (Gramin) | 40- Besa | Village Besa- Survey No. 1 to 96 | 20th January 2023. |
| | | | 40- Besa | Village Beltarodi-Survey No. 1 to 142 | |
| | | | 39-Kharbi | Village Pipla- Survey No. 1 to 221 | |
| | | | 39- Kharbi | Village Ghogali-Survey No. 1 to 41 | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIKANT LONDHE,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २० जानेवारी २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी २०२२/ प्र.क्र.६६/(२)/पं.रा.५.—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम पाच) यांचे कलम ५ यासह २५६ चे पोट-कलम (१) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांकाचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्रे स्तंभ क्रमांक (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक २० जानेवारी २०२३ पासून नागपूर जिल्ह्याच्या ७८- गोन्हीसिम व ७९ - बेसा गटातून वगळीत आहे आणि त्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पीएसई १०९६/प्र.क्र.११४/०५, दिनांक १९ सप्टेंबर १९९६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये, नागपूर जिल्ह्याशी संबंधित नोंद २६ मध्ये नागपूर तालुक्याशी संबंधित स्तंभ (३) मधील नोंदी समोर स्तंभ (४) मध्ये "७८- गोन्हीसिम व ७९ - बेसा गट" या शब्दाऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

"७८ - गोन्हीसिम व ७९- बेसा गट खालील स्तंभ (५) मध्ये नमूद केलेले स्थानिक क्षेत्र वगळून".

### अनुसूची

| अ. क्र. | जिल्हा | गट | निर्वाचक गण | स्थानिक क्षेत्र/तालुका | वगळण्याचा दिनांक. |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | नागपूर | नागपूर (ग्रामीण) | ७९- बेसा | मौजा बेसा सर्व्हे नं. १ ते ९६ | २० जानेवारी २०२३ |
| | | | ७९ - बेसा | मौजा बेलतरोडी सर्व्हे नं. १ ते १४२ | |
| | | | ७८- गोन्हीसिम | मौजा पिपळा सर्व्हे नं. १ ते २२१ | |
| | | | ७८- गोन्हीसिम | मौजा घोगली सर्व्हे नं. १ ते ४१ | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीकांत लोंढे,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 20th January 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

No.ZPB-2022/CR- 66/(2)/ PR-5.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 256 read with section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Nagpur Block of Nagpur District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the 20th January 2023 day of.............; and for that purpose amends the Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No.PSE-1096/CR-114/05, dated the 19th September, 1996 as follows, namely :—

In the Schedule appended to the said notification, in entry 26 relating to Nagpur District, against entry in column (3) relating to Nagpur Taluka, in column (4), for the words "78- Gonhisim and 79- Besa" the following shall be substituted, namely :—

"78- Gonhisim and 79- Besa Block excluding the following local areas specified in column (5)".

*Schedule*

| Sr. No. (1) | District (2) | Block (3) | Electoral College (4) | Local areas (5) | Date of exclustion (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Nagpur | Nagpur (Gramin) | 79- Besa | Village Besa- Survey No. 1 to 96 | 20th January 2023 |
| | | | 79- Besa | Village Beltarodi- Survey No. 1 to 142 | |
| | | | 78- Gonhisim | Village Pipla- Survey No. 1 to 221 | |
| | | | 78- Gonhisim | Village Ghogali- Survey No. 1 to 41 | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIKANT LONDHE,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २० जानेवारी २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.**

क्रमांक झेडपीबी २०२२/ प्र.क्र. ६६ / (३)/ पं.रा. ५.—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (सन १९५९ चा महा. अधिनियम तीन) यांचे कलम ४ चे पोट-कलम (२) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ चा खंड (ग) व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार व संविधानाच्या भाग -IX च्या उद्देशार्थ आणि स्थायी समिती जिल्हा परिषद नागपूर, ग्रामपंचायत बेसा- बेलतरोडी व पिपळा (घोगली), आणि ग्रामसभा बेसा- बेलतरोडी व पिपळा (घोगली) यांच्याशी विचार विनिमय करून महाराष्ट्र शासन याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले स्थानिक क्षेत्र त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून गावाचा भाग म्हणून राहणार नाही असे जाहीर करीत आहे.

### अनुसूची

| अ. क्र. (१) | महसुली गाव (२) | स्थानिक क्षेत्रे (३) | गाव म्हणून संपुष्टात आल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| १. | बेसा | मौजा बेसा सर्व्हे नं. १ ते ९६ | २० जानेवारी २०२३ |
| | बेलतरोडी | मौजा बेलतरोडी सर्व्हे नं. १ ते १४२ | |
| | पिपळा | मौजा पिपळा सर्व्हे नं. १ ते २२१ | |
| | घोगली | मौजा घोगली सर्व्हे नं. १ ते ४१ | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीकांत लोंढे,**
शासनाचे उप सचिव.

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 20th January 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Village Panchayats Act.

No.ZPB-2022/CR-66/(3)/PR-5.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*2*) of section 4 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), read with clause (*g*) of article 243 of the Constitution of India, and of all other powers enabling it in that behalf, and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, and after consultation with the Standing Committee of the Nagpur *Zilla Parishad, Village Panchayat and Gram Sabha* Besa-Beltarodi and Pipla(Ghogali) in Nagpur District, the Government of Maharashtra, hereby declares that the local areas specified in column (3) of the Schedule appended hereto, comprising the revenue villages Besa, Beltarodi, Pipla and Ghogali as specified in column (2) thereof, shall cease to be the village, for the purpose of Part IX of the Constitution, with effect from the date shown in column (4) thereof.

*Schedule*

| Sr. No. (1) | Revenue Village (2) | Local areas (3) | Date of cessation (4) |
|---|---|---|---|
| 1. | Besa | Village Besa- Survey No. 1 to 96 | 20th January 2023 |
| | Beltarodi | Village Beltarodi- Survey No. 1 to 142 | |
| | Pipla | Village Pipla- Survey No. 1 to 221 | |
| | Ghogali | Village Ghogali- Survey No. 1 to 41 | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIKANT LONDHE,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २० जानेवारी २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी २०२२/प्र.क्र.६६/पं.रा.५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ३४१ अ चे पोट-कलम (१), (१ब) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना नगरविकास विभाग क्र. एमयुएन २०१९/प्र.क्र.२४०/नवि १८, दिनांक २० जानेवारी २०२३, यात यापुढे जिचा उक्त अधिसूचना असा निर्देश करण्यात आला आहे) अन्वये महाराष्ट्र शासनाने नागपूर जिल्ह्यातील बेसा, बेलतरोडी, पिपळा व घोगली या महसुली गावांचे स्थानिक क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले आहे आणि त्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ अ चे पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बेसा-पिपळा नगरपंचायत या नावाने नगरपंचायत गठित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेस अनुसरून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा पाच) याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (सहा) अन्वये विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची मत्ता, हक्क आणि दायित्वे ( त्याने केलेला कोणताही करार किंवा संविदा या खालील हक्क व दायित्वे धरून ) उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा आदेश देणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, असा निदेश देते की, नागपूर जिल्हातील बेसा, बेलतरोडी, पिपळा व घोगली या महसुली गावांसंबधात नागपूर जिल्हापरिषदेच्या सर्व मत्ता, हक्क आणि दायित्वे (तिने केलेला कोणताही करार किंवा संविदा याखालील हक्क व दायीत्वे धरून) ही, शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक एमपीएच - १९९७ /सीआर-६४५/५६(४७), दिनांक २० जुलै १९९९ यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीवर बेसा-पिपळा नगरपंचायतीकडे हस्तांतरित झाल्याप्रमाणे असतील आणि तिच्याकडे निहित असतील

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीकांत लोंढे,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 20th January 2023.

**Order**

Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

No.ZPB-2022/CR-66/PR-5.—Whereas, the Government of Maharashtra, under the Notification, Urban Development Department, No.MUN-2019/C.R.240/UD- 18, dated 20th January 2023 (hereinafter referred to as " the said Notification") issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) has specified the local area of revenue villages of Besa, Beltarodi, Pipla and Ghogali in Nagpur District to be a transitional area, for which a *Nagar Panchayat* as provided in sub-section (*2*) of section 341A of the said Act, by the name of the *Besa Pipla Nagar Panchayat*, is constituted;

And whereas, pursuant to the said notification, it is expedient to issue an order for transfer of assets, rights and liabilities of the existing local authority (including the rights and liabilities under any agreement or contract made by it) to the successor local authority under clause (*vi*) of sub-section (*2*) of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*vi*) of sub-section (*2*) of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby directs that all the assets, rights and liabilities of the Nagpur *Zilla Parishad* (including the rights and liabilities under any agreement or contract made by it), in respect of the revenue villages Besa, Beltarodi, Pipla and Ghogali in Nagpur District shall stands transferred to and shall vest in the *Besa Pipla Nagar Panchayat* on the terms and conditions specified in the Government Resolution, Rural Development and Water Conservation Department, No. MPH-1997/CR- 645/56(47), dated the 20th July, 1999.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIKANT LONDHE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.